
# ३. गायन



## बडबड गीत

चिवचिव करत चिमणी आली
कोकिळा कुहुकुहु गाऊ लागली
मिठू मिठू बोलत पोपट आला
कावळा काव काव करू लागला
गाऊ लागले डोलू लागले
आनंदाने नाचू लागले
सोसाट्याचा आला वारा
ढगातून आल्या पाऊसधारा
सर्वांना आनंद झाला
मोर थुइ थुइ नाचू लागला









## समूह गीत

म्याऊ म्याऊ करतंय कोण ?
मनीची पिल्ले आणखी कोण
भो भो करतंय कोण ?
खंड्या कुत्रा आणखी कोण
हूप हूप करतंय कोण ?
झाडावरची माकडं आणखी कोण
डराव डराव करतंय कोण ?
बेडूकदादा आणखी कोण
हंबा हंबा करतंय कोण ?
कपिला गाय आणखी कोण



- वरील बडबडगीते तालासुरात म्हणून घ्यावीत. या प्रकारची इतर गाणी म्हणून घ्यावीत.
- गीतांचा संग्रह करावा.

## लोकगीत





जात्याच्या घरघर घरघर आवाजाने मला जाग आली. बाहेर येऊन पाहिले तर ओसरीवर बसून आजी धान्य दळत होती. धान्य दळता दळता गाणंही म्हणत होती. किती गोड आवाज आहे आजीचा! मी खिडकीतून पाहिलं तर अजून सूर्य उगवला नव्हता पण पक्ष्यांचा किलबिलाट मात्र चालू होता. मी आजीजवळ जाऊन विचारलं आजी कुठलं गाणं म्हणतेस. आजी म्हणाली, "याला जात्यावरच्या 'ओव्या' म्हणतात" आणि आजी पुन्हा गाणं म्हणू लागली.

दळनाच्या मिसे, मी जात्यावर बसे
रामरायाला गं माझ्या, ओवी गाईन उल्हासे
पहाटेच्या प्रहरामध्ये, वासुदेवाच्या आल्या झुंडी
बापाजीच्या माझ्या, वाडा बळियाचा धुंडी
एकलीचं नातं, दोघींचा येतो गळा
जनीला दळू लागे, देव विठ्ठल सावळा

शीवेला केलं शेत, गावंदरीला केला मळा
बयाच्या बाळाचा, मोटकऱ्याचा एका गळा
माळ्याच्या मळ्यामंधी, कोण हौशा गाणी गातो
सख्या पंढरीराया माझ्या, फुलझाडांना पाणी देतो
सरलं दळण, सुरत्या सुपात पाच गहू
आम्हां देवाने दिले भाऊ,
आम्ही बहिणी ओव्या गाऊ.




"ह्या ओव्या ही गाणी कुठून शिकलीस गं आजी?" "अरे बाळा, ही तर आपल्या संस्कृतीतील पारंपरिक लोकगीतं आहेत. माझी आई दळताना, कांडताना म्हणायची. मी तिच्याकडूनच शिकले." मला तर खूप आवडली ही लोकगीतं.

◆ अहिराणी लोकगीत

जात्या ईश्वरा, तुले वढून पाहिलं
माऊलीनं दूध, कारने लावीलं
पहिली ववी गावू, ईठ्ठल चांगलाले
खोंग खोंग मोती, जनाबाईना पदरले

डॉ. उषा सावंत

◆ लोकगीतं सादर करण्याची संधी द्यावी. ओव्यांबद्दल अधिक माहिती द्यावी. इतर स्थानिक भाषेतील वेगवेगळ्या ओव्या तालासुरात म्हणून घ्याव्यात. ◆ लोकगीतांचा संग्रह करावा.




## स्वरालंकार

सा रे ग म प ध नि हे संगीतातील सात स्वर तर आपल्याला माहीतच आहेत.

सा रे ग म प ध नि याप्रमाणे स्वरांच्या चढत्या क्रमास 'आरोह' म्हणतात

तर सां नि ध प म ग रे याप्रमाणे स्वरांच्या उतरत्या क्रमास 'अवरोह' असे म्हणतात.

(१)

सारेग रेगम गमप मपध पधनि धनिसां
सांनिध निधप धपम पमग मगरे गरेसा

(२)

सारेगम रेगमप गमपध मपधनि पधनिसां
सांनिधप निधपम धपमग पमगरे मगरेसा

(३)

सारेसारेग रेगरेगम गमगमप मपमपध पधपधनि धनिधनिसां
सांनिसांनिध निधनिधप धपधपम पमपमग मगमगरे गरेगरेसा



## तालरचना

हाताने टाळी देणे
१-२-३-४ , १-२-३-४
याप्रमाणे हाताने टाळी देऊया. याच्याबरोबर उपलब्ध वाद्यावर किंवा वस्तूवर ताल देऊया.

- स्वरालंकार तालासुरात म्हणून घ्यावेत. १-२-३-४ याप्रमाणे हाताने टाळी देऊन उपलब्ध वाद्यावर किंवा वस्तूवर ताल देण्याची प्रत्यक्ष कृती करून घ्यावी. मागील वर्षी शिकलेल्या टाळ्यांचा सराव करून घ्यावा. प्रत्यक्ष कृती करून घ्यावी.